ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

# अर्थ

वर्ष २४ | पुणे, बुधवार, ७ ऑगस्ट, १९६८ | अंक १५



### स्कोके झालेल्या मोटारगाडीचे पाऊण कोटी रुपये झाले

इंग्लंडमधील एका लष्करी अधिकाऱ्याने ६२ वर्षांपूर्वी एक मोटारगाडी विकत घेतली. ती एकसारखी बंद पडू लागल्यामुळे त्याने ते स्कोके मूळ कारखानदाराकडे परत पाठविले आणि आपले पैसे परत मागितले. पण त्या फर्मजवळ पैसे नव्हते, तेव्हा फर्मने स्वतःच्या कंपनीत त्याला ४,००० रुपयांचे शेअर्स देऊ केले. त्याने ते स्वीकारले. पुढे तो ते सर्व विसरून गेला. आता ती कंपनी मोटरगाड्या करीत नाही; इंजिनिअरिंगचा इतर काही माल करते; तिचे रूपांतर पब्लिक कंपनीत झाले आहे. लष्करी अधिकाऱ्याला मिळालेल्या शेअर्सची आजची किंमत पाऊण कोटी रुपये झाली आहे. तो नुकताच मरण पावला, तेव्हा त्याच्या कुटुंबियांना ६२ वर्षे थांबल्याचा फायदा मिळाला.

---

### खताच्या आयातीसाठी अमेरिकेचे कर्ज


भारताला खताची आयात करता यावी म्हणून अमेरिकेने १७.२५ कोटी रुपयांचे कर्ज देण्याचा करार केला आहे. कर्जाचा उपयोग करून भारताला १ लाख टनापेक्षा अधिक नत्रयुक्त खते अगर १५ हजार टन फॉस्फेट खत आयात करता येईल. १९६७–६८ साली खतांची आयात करण्यासाठी अमेरिकेने भारताला १०८.७५ कोटी रुपये कर्ज दिले होते. त्या साली भारताने एकूण १९५ कोटी रुपये किमतीची खते आयात केली होती. अमेरिकेने भारताला १६८.७५ कोटी रुपयांचे मुक्त कर्ज देण्याचा करार गेल्या मे महिन्यात केलेला आहे. त्यांतील ७१ कोटी रुपयांचा वापर खतांची व इतर शेतीविषयक मालाची आयात करण्यासाठी करू दिला जाणार आहे. बहुतेक मालाची आयात चालू वर्षातच करण्यात येईल. त्याचप्रमाणे येत्या १२ महिन्यांत खतांची आयातही चालू होईल.

---

### मुसोलिनींच्या विधवेला निवृत्तिवेतन

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात इटलीचा हुकूमशहा असलेल्या सिनॉर मुसोलिनींच्या विधवेला निवृत्तिवेतन मिळण्याचा अधिकार आहे, असा निर्णय त्या देशातील कोर्ट ऑफ अकौंटसने दिला आहे. मुसोलिनी ह्याने इटालिअन सरकारची दीर्घ काळ सेवा केली असल्याने त्याला सेवानिवृत्तिवेतनाचा हक्क प्राप्त झाला होता. म्हणून त्याच्या विधवा पत्नीला ते देण्यात यावे असा युक्तिवाद कोर्टाने केला. मुसोलिनी आणि त्याची रखेली ह्यांना इटालिअन गनिमांनी १९४३ मध्ये गोळ्या घालून ठार मारले. मुसोलिनीच्या पत्नीचे नाव डोना रॅचेल असे असून आता त्या ७७ वर्षांच्या आहेत. १९५७ सालापासून सेवानिवृत्तीचे वेतन मिळावे म्हणून त्यांनी कोर्टात दावा गुदरला होता. युद्धात कामास आलेल्या सैनिकाची पत्नी म्हणून अगर सरकारी नोकराची विधवा पत्नी म्हणून हे वेतन मिळाले पाहिजे असा त्यांचा दावा होता.

अर्थ (पाक्षिक) महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते. वा. व. रु. ६=०० ट. ख. सह "दुर्गाविलास" पुणे ४.



☆ अर्थ ☆

बुधवार, ७ ऑगस्ट, १९६८



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । --कौटिलीय अर्थशास्त्र

## रशिआच्या बदललेल्या धोरणाचा अन्वयार्थ

रशिआने पाकिस्तानला शस्त्रास्त्रे पुरविण्याचा निर्णय तत्त्वतः घेतला आहे. ह्या नव्या धोरणाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न आंतरराष्ट्रीय राजकारणाचे अभ्यासक करीत आहेत. त्यांच्या मताने, रशिआने अलिप्ततेचा अर्थ वेगळ्या तऱ्हेने लावण्यास प्रारंभ केला आहे. रशिआची सत्ता क्रुश्चाव्ह ह्यांच्या हाती असताना अलिप्ततेच्या धोरणाचा अर्थ लष्करी गटात सामील न होणे आणि साम्राज्यशाहीविरोधी आणि वसाहतवादविरोधी भूमिका घेणे असा लावला जात होता. भारत खऱ्या अर्थाने अलिप्ततावादी गणला जात होता. अर्थातच त्याला राजकीय व आर्थिक मदत देणे इष्ट समजले जात होते. राजकीय दृष्ट्या काश्मीर हा भारताचाच भाग आहे असा अभिप्राय क्रुश्चाव्ह ह्यांनी व्यक्त केला. चीनने भारतावर १९६२ साली आक्रमण केले तेव्हा चीनचा तेलपुरवठा बंद करण्यात आला आणि भारताला संरक्षणाच्या सामग्रीची मदत पाठविण्यात येऊ लागली. भारताने गोव्याविरुद्ध केलेल्या लष्करी कारवाईला पाठिंबा देण्यात आला. १९६४ च्या ऑक्टोबरमध्ये क्रुश्चाव्ह ह्यांना पदच्युत करण्यात आले. तेव्हापासून रशिआच्या भारताविषयीच्या धोरणात फरक पडू लागला. १९६५ साली रशिआच्या कम्युनिस्ट पक्षाला सादर केलेल्या अहवालात चिटणीस मि. ब्रेझनेव्ह ह्यांनी असे म्हटले की रशिआ भारत आणि पाकिस्तानसारख्या प्रमुख आशिआई देशांशी असलेले संबंध सुधारण्याचा प्रयत्न करीत आहे. कारण हे देश रशिआचे शेजारी आहेत. भारत आणि पाकिस्तान ह्यांना एकाच मापाने मोजण्याच्या धोरणाचे हे पहिले पाऊल ठरले. १९६६ साली रशिआच्या कम्युनिस्ट पक्षाने अलिप्ततावादी देशांचे दोन गटात वर्गीकरण केले. पहिल्या गटात संयुक्त अरब प्रजासत्ताक, सिरीआ, अल्जीरिआ, ब्रह्मदेश, गिनी आणि माली ह्या देशांचा समावेश करण्यात आला. रशिआच्या मताने हे देश समाजवादी प्रगतीसाठी जोराचे प्रयत्न करीत आहेत.

दुसऱ्या गटात भारतासारख्या शेजाऱ्यांचा समावेश करण्यात आला. ह्याचा अर्थ असा की अलिप्ततावादात आता आणखी काही गोष्टींची भर घालण्यात आली. लष्करी गटापासून दूर राहाण्याबरोबर देशांतर्गत राजकीय व आर्थिक घडामोडींचाही विचार करण्यात येऊ लागला. १९६५ च्या प्रारंभी एका रशिअन लेखकाने असे स्पष्टच लिहिले की भारत त्याच्या जाहीर केलेल्या समाजवादी ध्येयापासून चळला असून अमेरिकेतील मक्तेदार भांडवलशाहीशी निकटचे सहकार्य करीत आहे. भारताने परदेशी खाजगी भांडवलाला राष्ट्रीयीकरणाविरुद्ध अभय दिलेले आहे. त्याचबरोबर भारत समाजवादी देशांकडून मदत मात्र घेत आहे. समाजवादी देशांचा गट आणि साम्राज्यवादी गट ह्यांच्यामधील संबंधाचा फायदा घेऊन आपले हित साधण्याचा प्रयत्न भारत करीत आहे. दोन्ही गटांकडून जास्तीत जास्त आर्थिक साह्य मिळविण्याची त्याची खटपट चालू आहे. भारतामधील उजव्या मतप्रणालीचे पक्षच केवळ कम्युनिझमविरोधी वृत्ती दाखवीत आहेत, असे नाही. हिंदी राष्ट्रीय काँग्रेसमधील काही गटही अशाच वृत्तीचे आहेत; ह्या विचारप्रणालीवरून असे दिसते की १९६५ पासूनच रशिआ भारताला 'शेजारी' मानू लागला होता. ह्या शेजाऱ्यात पाकिस्तान, तुर्कस्तान आणि इराण ह्यांचाही समावेश करण्यात आला होता. हे देश रशिआच्या मताने समाजवादी बदलासाठी हिरिरीने प्रयत्न करणार नाहीत. अर्थातच त्यांना एकाच माळेत बसविण्यात आले. ह्या सर्वच देशांशी असलेले संबंध सुधारण्याचा रशिआचा प्रयत्न चालू आहे. हे सर्व देश पश्चिमेकडील राष्ट्रांनी उभारलेल्या लष्करी गटात सामील झालेले असले आणि भारत तसा सामील झालेला नसला तरी त्यांच्यात फरक करण्याचे कारण नाही अशी भूमिका रशिआने घेतली. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली म्हणजे १९६५ च्या आरंभी पाकिस्तानने कच्छवर आक्रमण केल्यावर रशिआने पाकिस्तानला उघडपणे आक्रमक म्हटले नाही, ह्याचे मर्म लक्षात येते.

---

## परदेशी प्रवाशांना आकर्षित करण्याचा मोठा कार्यक्रम

चौथ्या पंचवार्षिक योजनेत परदेशीय प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी एक मोठा कार्यक्रम भारताच्या पर्यटन विभागाने सुचविला आहे. कार्यक्रम पुरा करण्यासाठी ५२ कोटी रुपये खर्च येणार आहे. तो पूर्ण झाल्यावर परदेशीय प्रवाशांपासून मिळणाऱ्या हुंडणावळीच्या प्राप्तीत एकदम मोठी भर पडेल अशी अपेक्षा आहे. भारत सरकारची इतर संलग्न खाती आणि खाजगी मालकीचे भांडवलही ह्या कार्यक्रमाला तितक्याच रकमेचा हातभार लावणार आहे. कार्यक्रमामुळे चौथ्या पंचवार्षिक योजनेत भारताला २०२ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळेल

असा कयास आहे. त्याशिवाय प्रवासावर होणाऱ्या खर्चावरील करांच्या रूपाने १३७ कोटी रुपये मिळतील ते वेगळेच. पर्यटन विभागातर्फे करण्यात येणाऱ्या ५२ कोटी रुपयांपैकी २४·५४ कोटी रुपये विभागातर्फे अमलात आणावयाच्या कामावर खर्च होतील, १३ कोटी रुपये राज्य सरकारांनी आखलेल्या विकास-कार्यावर खर्च होतील आणि १४·५० कोटी रुपये इंडिआ टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ह्या संघटनेतर्फे खर्च करण्यात येतील. कॉर्पोरेशनतर्फे सार्वजनिक मालकीच्या विभागात १० होटेल्स बांधण्यात यावयाची असून त्यासाठी १० कोटी रुपये लागतील. त्यांपैकी १ कोटी रुपये परदेशी चलनात लागतील. त्याशिवाय प्रेक्षणीय ठिकाणी असलेल्या राहण्याच्या सोयीत अधिक भर घालण्यात येणार आहे. जकात न घेता माल विकणारी दुकाने काढण्यात येणार आहेत. वाहतुकीची चांगली व्यवस्था करण्यासाठी १·५ कोटी रुपये गुंतविण्यात येणार आहेत. बंगलोर, मुंबईमधील जुहूचा समुद्रकिनारा, श्रीनगर, डमडम विमानतळ, गोवा, वाराणसी, जयपूर, कोचीन, इत्यादी ठिकाणी होटेल्स उभारण्यात येणार आहेत.

प्रथमच भारत सरकारच्या पर्यटन विभागाशी एअर इंडिआ इंटरनॅशनल सहकार्य करणार आहे. जुहू येथील ३०० खोल्यांचे हॉटेल बांधण्याचे एअर इंडियाने मान्य केले आहे. हॉटेलसाठी येणाऱ्या ३ कोटी रुपये खर्चापैकी ५० टक्के खर्च एअर इंडिआ करणार आहे. त्याशिवाय सांताक्रुझ ( मुंबई ) आणि डमडम ह्या ठिकाणीही १०० खोल्यांची हॉटेल्स ती कंपनी बांधणार आहे. १९७३ पर्यंत भारतात ६ लाख परदेशी प्रवासी येऊ लागतील असा अंदाज करण्यात आला आहे. हा अंदाज आधारादाखल घेतला तर झोपण्याची व्यवस्था असलेल्या ३१ हजार खोल्या हॉटेल्समधून बांधाव्या लागतील. सध्या सर्व हॉटेल्समध्ये मिळून अशा अवघ्या ३ हजार खोल्याच आहेत. त्यामुळे, येणाऱ्या प्रवाशांना आकर्षक प्रेक्षणीय स्थळांकडे काहीसे घाईघाईने रवाना करावे लागते. कुलू खोरे, केरळमधील रम्य समुद्रकिनारा, जम्मू व काश्मीर आणि पशुपक्ष्यांसाठी राखण्यात आलेली अभयस्थाने ह्यांचा ह्या कामी उपयोग होतो. इंडिअन ऑइल कॉर्पोरेशनने सात प्रवासी होटेल्स बांधावी अशी खटपट करण्यात येत आहे. प्रवाशांना मार्गदर्शन करण्यासाठी व भिकाऱ्यांच्या तांड्यांपासून त्यांना त्रास होऊ नये म्हणून खास प्रवासी पोलिसपथके निर्माण करण्यात येणार आहेत. प्रेक्षणीय स्थळांची माहिती सांगणाऱ्या गाईडसची फार आवश्यकता असते. त्यांच्या अभावी अशा स्थळांबद्दल नीट माहिती मिळत नाही. म्हणून अशी माहिती सांगणाऱ्या गाईडसना शिक्षण देऊन तयार करण्यात येणार आहे. देशांतर्गत प्रवासालाही उत्तेजन देण्यात येणार आहे. त्यासाठी मध्यम व कमी उत्पन्नाच्या गटातील लोकांना सोयी उपलब्ध करून देण्यात येतील

— —





सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण


— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :–३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES




GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

# कुलकर्णी फौंड्रीज लि.


## हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, पुणे १३

प्रामुख्याने किर्लोस्कर उद्योग समुहांतील पुण्यातील कारखान्यांना लागणारे बिडाचे ओतीव भाग तयार करणारा कुलकर्णी फौन्ड्रीज प्रा. लि. हा कारखाना पुण्याच्या औद्योगिक परिसरात सन १९५८ पासून काम करीत आहे. येथील हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेटमध्ये कारखान्यासाठी कंपनीच्या मालकीची अंदाजे ५ एकर जागा असून सध्याचा कारखाना त्यावर उभा आहे. सुरुवातीला २० कामगारांना काम देणाऱ्या या कारखान्यात सध्या २५० चे वर कामगार काम करत आहेत. त्याचप्रमाणे सुरुवातीची वार्षिक सुमारे रु. २ लाखाची विक्री सध्या रु. ४० लाखाच्या घरात गेलेली आहे.

बिडाच्या ओतकामाबरोबरच कंपनीने फौन्ड्री धंद्यासाठी लागणारी सर्व तऱ्हेची अद्ययावत यंत्रसामग्री तयार करण्याचे काम सन १९६२ पासून सुरू केले आहे. कारखान्यात तयार होत असलेले बिडाचे ओतीव भाग व फौन्ड्री धंद्याला लागणारी यंत्रसामग्री औद्योगिक जगात आता अनुभवाने मान्य केली गेली आहे.

फौन्ड्री यंत्रसामग्री विभागात तयार होत असलेल्या "ऑईल फायर्ड रोटरी फरनेसेस" तयार करण्यासाठी कंपनीला या धंद्यातील जगप्रसिद्ध "मोनोमीटर मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लि., इंग्लंड" या कंपनीचे तांत्रिक सहकार्य लाभले आहे. या "रोटरी फरनेसचे" उत्पादन व विक्री सुव्यवस्थित चालू आहे. तसेच फौन्ड्री विभागाला लागणाऱ्या "इलेक्ट्रिक आर्क" फरनेसचे उत्पादन करण्यासाठी कंपनीला "व्हाईटिंग इंटरनॅशनल" या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या अमेरिकन कंपनीचे तांत्रिक सहकार्य लाभले आहे. या "आर्क फरनेसचे" उत्पादनही लौकरच सुरू होत आहे.

कंपनीचे सध्याचे शेअर भांडवल रु. ५ लाखाचे असून ते प्रत्येकी रु. १०० च्या ऑर्डिनरी शेअरमध्ये (साधे भाग) विभागलेले आहे. कंपनी सुरुवातीपासूनच शेअर होल्डर्सना डिव्हिडंड देत आली आहे. चालू मंदीचे वर्ष वगळल्यास गेल्या



**श्री. डी. जी. कुलकर्णी**
मॅनेजिंग डायरेक्टर.

चार वर्षांपासून शेअर होल्डर्सना १०% करप्राप्त डिव्हिडंड मिळत आहे. सध्या कंपनीने एकूण पंधरा लाख रुपये भांडवल विक्रीस काढले असून त्यापैकी रुपये १० लाखाचे ऑर्डिनरी शेअररूपाने व रुपये ५ लाखाचे अग्रहक्क भागाचे (प्रेफरन्स शेअर्स) भांडवल जमा करण्याचे ठरविले आहे. या अग्रहक्क भांडवलावर कंपनी प्रतिवर्षी १०% करप्राप्त डिव्हिडंड देणार आहे व हे शेअर्स घेतल्यापासून १० वर्षांनंतर ते भागधारकांच्या इच्छेनुसार साधारण भाग भांडवलामध्ये बदलून देण्याची सोय केली आहे, किंवा तसे नको असल्यास या मुदतीनंतर त्या शेअरची मूळ किंमत त्या त्या अग्रहक्क भागधारकांना परत केली जाणार आहे. साधारण भाग भांडवल धारकांस डिव्हिडंड हा होणाऱ्या नफ्याच्या कमी-अधिक प्रमाणात मिळेल.

कंपनीचे संचालक मंडळ या धंद्यातील तज्ज्ञ आहेत. त्यांच्या अनुभवाचा फायदा कंपनीला मिळत आहेच. या कंपनीच्या संचालक मंडळाची धुरा कंपनीचे चेअरमन म्हणून किर्लोस्कर उद्योग समूहाचे श्री. चंद्रकांत शंतनुराव किर्लोस्कर पाहणार आहेत. त्यांच्या अनुभवाचा व मार्गदर्शनाचा कंपनीला लाभ होणार असल्यामुळे कंपनीचे भवितव्य निश्चितच उज्ज्वल आहे.

**हिंदच्या तिकिटांना मागणी**—हिंदच्या पोस्टाच्या तिकिटांना परदेशात फार मागणी येऊ लागल्यामुळे त्यांचे भाव खूप वाढले आहेत. गेल्या वर्षात महात्मा गांधींचे चित्र असलेल्या पोस्टाच्या तिकिटांची किंमत दुपटीने वाढली आहे. १० रुपयांच्या अशा न वापरलेल्या तिकिटाला शोकिन लोक ४०० पौंडापर्यंत किंमत देऊ करीत आहेत. लवकरच ही किंमत ५०० पौंडापर्यंत वाढण्याची शक्यता आहे. हिंदमधील कवींच्या व संतांच्या तिकिटांची लोकप्रियताही वाढत आहे.

**मंत्र्यांना दिलेली परदेशी हुंडणावळ**—गेल्या मे आणि जूनमध्ये आठ केंद्रीय मंत्री परदेशी गेले, त्या सर्वांना वैयक्तिक फुटकळ खर्चासाठी दिलेल्या परदेशी हुंडणावळीची बेरीज ३,१५४ रुपये झाली. श्रीमती इंदिरा गांधींनी ३७८ रुपयांत भागविले.

**अमेरिकेतील शहरांत गुन्हे वाढले**— वॉशिंग्टनमधील गुन्ह्यांची संख्या गेल्या १२ महिन्यांत २४.५% वाढली असून त्या शहरात येणाऱ्या प्रवाशांची संख्या घटली आहे. अमेरिकेतील इतर काही शहरांतही अशीच परिस्थिती आहे.

## ग्रामीण कर्जरोख्यांची आठवी श्रेणी

### नाविन्यपूर्ण योजनेची वैशिष्ट्ये

महाराष्ट्र सरकारने मुंबई राज्य सहकारी भू-तारण बँकेस ग्रामीण कर्जरोख्यांची रुपये १·५ कोटींची आठवी श्रेणी ग्रामीण बचत सर्टिफिकेटच्या स्वरूपात उभारण्यास परवानगी दिली आहे. वरील रकमेपैकी रुपये ७० लाख ग्रामीण विभागांतील व्यक्तींकडून मिळवावयाचे आहेत. रुपये ७० लाखांचे कर्जरोखे ग्रामीण विभागांत खपविले गेल्यास रिझर्व बँकेकडून ८० लाख रुपये आठव्या श्रेणीपोटी १५ वर्षांच्या मुदतीकरिता मिळणार आहेत. आठव्या श्रेणीसाठी ग्रामीण विभागांमधून रकमा जमा करण्याची मुदत १ जुलै १९६८ ते ३१ मार्च १९६९ आहे. वरील ग्रामीण बचत सर्टिफिकेटे सात वर्षे मुदतीची आहेत व त्यावर द. सा. द. शे. ६½ टक्के व्याजाचा दर आहे. मुद्दल रकमेवर द. सा. द. शे. ६½ टक्के दराने होणाऱ्या वार्षिक व्याजाची रक्कम मुद्दलामध्ये चक्रवाढ व्याजाच्या पद्धतीने जमा केली जाईल आणि सात वर्षांची मुदत संपताच व्याजासह मुद्दल रकमेची फेड केली जाईल. कोणत्याही व्यक्तीस १ श्रेणीमध्ये रुपये १०,००० पर्यन्त रक्कम गुंतविता येईल. कोणत्याही संस्थेस वरील बचत सर्टिफिकेटांमध्ये रक्कम गुंतविता येणार नाही. बचत सर्टिफिकेटांच्या रकमेचे भाग-प्रमाण रुपये २५, ५०, १००, १,०००, ५,००० आणि रुपये १०,००० चे असेल. ग्रामीण बचत रोख्यांची तबदिली व्यक्तीच्या नावे सुलभरीत्या करता येईल. बचत रोख्यांच्या तारणावर स्टेट बँक ऑफ इंडिया किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून कर्ज मिळू शकेल.

शिखर बँकेने आतापर्यंत ग्रामीण कर्जरोख्यांच्या सात श्रेणींची उभारणी केली असून त्या पोटी रुपये ४ कोटी, ६२ लाखांची रक्कम जमविण्यात आली आहे. बँकेने नवीन विहिरींची खोदाई, जुन्या विहिरींची दुरुस्ती, जमीन सुधारणा करणे, ट्रॅक्टर्स, ऑईल इंजिन व पंप-सेट्स् खरेदी व पाणीपुरवठा योजना, इत्यादी कारणाकरिता १९६७–६८ या सालासाठी रुपये १५ कोटींचा कर्जपुरवठा केलेला आहे. वरील कारणाकरिता १९६८-६९ या सहकारी वर्षामध्ये रुपये २५ कोटींचा कर्जपुरवठा करण्याचे ठरविले आहे. वरील कर्जवाटपांचा कार्यक्रम यशस्वी रीतीने अमलात आणण्यासाठी बँकेस सर्वसाधारण कर्जरोखे व ग्रामीण बचत रोख्यांची विक्री करून पैसा उभारावा लागेल. राज्य सरकार व रिझर्व बँक यांनी पण भूविकास बँकांनी ग्रामीण कर्जरोखे उभारण्याच्या कार्यक्रमाकडे जास्त लक्ष केंद्रीत करावे असे सुचविले आहे. त्याकरिता ८ व्या श्रेणीच्या बचत रोख्यात जास्तीत जास्त रक्कम गुंतवून शेतीच्या विकासासाठी हातभार लावणे अगत्याचे आहे. ग्रामीण बचत रोख्यांमध्ये गुंतविलेली रक्कम धान्योत्पादन वाढविण्यासाठी भूविकास बँकेकडून शेतकऱ्यांस कर्जरूपाने दिली जाणार असल्यामुळे ग्रामीण विभागातील जनतेने या बचत रोख्यात आपली रक्कम गुंतवावी व पर्यायाने अन्नोत्पादनास व राष्ट्राच्या विकासास हातभार लावावा.

वरील बचत रोख्यांमध्ये रक्कम गुंतविण्याचे अर्ज व संबंधित माहिती मुंबई राज्य सहकारी भू-तारण बँक, किंवा जिल्हा निहाय, सर्व प्राथमिक भू-विकास बँका व त्यांच्या शाखांमार्फत मिळू शकेल.

---

### वॉशिंग्टनमध्ये विठोबाचे मंदिर बांधले

अमेरिकेतील वॉशिंग्टन शहरात एका अमेरिकन भक्ताने विठ्ठलाचे मंदिर स्थापन केले आहे. एका राहत्या घरातच हिंदुधर्माचे हे केंद्र चालू करण्यात आले आहे. हिंदुधर्माचा स्वीकार केलेल्या अमेरिकन नागरिकांनाही मंदिरात पूजाअर्चा करता येईल. त्याशिवाय आध्यात्मिक व धार्मिक ग्रंथांचे एक वाचनालयही तेथेच उघडण्यात आले आहे. श्रीमती पॉलिन नॅश ह्या भक्ताने ही वातानुकुलित इमारत केंद्रासाठी घेतली आहे. इमारतीची किंमत ४५ हजार डॉलर्स अथवा २·४ लाख रुपये असून तिला तीन मजले आहेत. गेल्या वर्षी गंगा नदीच्या काठावर श्रीमती नॅश ह्यांनी विधिपूर्वक हिंदुधर्माची दीक्षा घेतली. बाईंचे वय अवघे ३२ वर्षांचे आहे. हिंदुधर्मात प्रवेश केल्यावर त्यांनी आता भगिनी गीता असे नवे नाव धारण केले आहे. त्या व्हर्जिनियामधील एका सधन कुटुंबातील आहेत. वॉशिंग्टनमधील ह्या हिंदुधर्माच्या केंद्राचे उद्घाटन बंगलोरमधील स्वामी केशवदास ह्यांनी केले. त्या वेळी पूजामंदिरात विठोबाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. ह्या प्रसंगी वॉशिंग्टनमधील भारत सरकारच्या वकिलातीच्या कचेरीतील काही अधिकारी मुद्दाम आले होते. त्याशिवाय इतर काही हिंदू आणि साडी परिधान केलेल्या काही अमेरिकन स्त्रियाही हजर होत्या. त्यापैकी काही न्यूयार्क व इतर शहरांतून आलेल्या होत्या. विठोबाची मूर्ती म्हैसूरमध्ये सापडणाऱ्या काळ्या दगडातून कोरण्यात आली आहे. ती सव्वादोन फूट उंचीची असून नेहमीप्रमाणे कंबरेवर हात ठेवलेली आहे. म्हैसूर दरबारातील एका शिल्पतज्ज्ञाने मूर्ती तयार केली आहे. स्वामी केशवदास ह्यांनी गेल्या वर्षी शिकॅगो शहरातही एक विठ्ठलमंदिर उभारले आहे. ह्यात विठ्ठलाची लाकडाची मूर्ती बसविण्यात आली आहे. वॉशिंग्टनमधील विठ्ठलाची पूजा एखाद्या ब्रह्मचाऱ्याला शिकविण्यात येणार आहे. तो अमेरिकन असला तरी चालेल.

---

### प्रत्येक इंग्रज दररोज सरासरीने ५ कप चहा पितो

ग्रेट ब्रिटनमध्ये गेल्या वर्षी प्रत्येकजण सरासरीने १,८४० कप चहा प्याला. १९६६ मधील सरासरी १,७५० कपांची होती. एक पौंड पत्तीचा २०० कप चहा होतो, ह्या हिशेबाने ही आकडेवारी केलेली आहे. ग्रेट ब्रिटनने गेल्या वर्षी भारतकडून २४,२४,३९,००० पौंड चहाची आयात केली.

## मदत कपातीचा उद्योगधंद्यांवर परिणाम

भारताला मदत करणाऱ्या देशांकडून ९० कोटी डॉलर्सची मदत चालू वर्षासाठी मिळेल अशी अपेक्षा करण्यात येत आहे. ही मदत मुक्त म्हणजे कोणत्याही विशिष्ट प्रकल्पासाठीच दिलेली अशी नाही. अर्थात अशा मदतीचा उपयोग भारताला आपल्या गरजेप्रमाणे करण्याचे स्वातंत्र्य असते. परंतु ह्या मदतीत कपात करण्यात आल्यास भारताच्या औद्योगिक उत्पादनावर परिणाम होणार आहे. औद्योगिक विकासाचा व आयातीचा कार्यक्रम आखणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांनी आणि काही उद्योगपतींनी असा अभिप्राय व्यक्त केला आहे. अमेरिकेने परदेशांना द्यावयाच्या मदतीत मोठ्या प्रमाणावर कपात केल्याने हा प्रसंग ओढवणार आहे. भारत-मदतसंघातील देशांनी १९६७–६८ साठी भारताला सुमारे ६० कोटी डॉलर्सची मदत केली होती. मदतीच्या दिलेल्या आश्वासनापेक्षा ही मदत ३० कोटी डॉलर्सनी कमी होती. मदत कार्यक्रमातील आपल्या वाट्यात अमेरिकेने कपात केली आणि आंतरराष्ट्रीय विकास मंडळानेही हात आखडता घेतला. त्यामुळे मदतीत इतकी तूट आली. ह्या वर्षी निर्बंधरहित मदत म्हणून मिळणाऱ्या रकमेखेरीज १० कोटी डॉलर्सची रक्कम कर्जाच्या परतफेडीबाबत मिळणाऱ्या सवलतीच्या रूपाने उपलब्ध होणार आहे. मदत-गटातील तीन देशांनी आतापर्यंत मदतीच्या करारावर सह्या केल्या आहेत. करार करण्यात पहिला क्रम ब्रिटनचा आहे. ब्रिटनने भारताला चालू वर्षासाठी दोन कर्जे दिली आहेत, त्यांची एकूण रक्कम १·६ कोटी पौंड होते. त्यापैकी अंदाजे निम्मी रक्कम पूर्वीच्या कर्जाच्या परतफेडीसाठी राखून ठेवण्यात आली आहे. पश्चिम जर्मनीने ४७ कोटी रुपयांचे कर्ज दिले आहे. हॉलंडने ९२ लाख डॉलर्सच्या मदतीचा करार केला आहे.

## कुटुंबनियोजनासाठी राज्यांना दिलेली मदत

लोकसंख्येला आळा घालण्यासाठी कुटुंबनियोजनाचा प्रचार व प्रसार करण्यात येत आहे. ह्या कार्यक्रमासाठी भारत सरकारच्या आरोग्य खात्याने राज्य सरकारांना २६·१५ कोटी रुपयांची मदत देण्याचे ठरविले आहे. कुटुंबनियोजनाच्या सर्व योजनांवर ही रक्कम चालू वर्षात राज्य सरकारांनी खर्च करावयाची आहे. निरनिराळ्या राज्यांना मिळणाऱ्या रकमांचे आकडे असे आहेत. उत्तर प्रदेश ३·१९ कोटी, महाराष्ट्र २·९ कोटी, मध्य प्रदेश २·४४ कोटी, आंध्र प्रदेश २·४२ कोटी, गुजरात १·८ कोटी, बिहार १·५८ कोटी, म्हैसूर १·६ कोटी, राजस्तान १·५५ कोटी, मद्रास १·५८ कोटी, केरळ १·३ कोटी आणि पश्चिम बंगाल २·०५ कोटी. राज्यांनी आपल्या अंदाजपत्रकात ह्या कामासाठी केलेली पैशाची तरतूद, त्यांनी ठरविलेली उद्दिष्टे, कुटुंबनियोजन कार्यातील त्यांची प्रगती, इत्यादी बाबींचा विचार करून मदतीचे आकडे ठरविण्यात आले आहेत.

## जननाचे प्रमाण घटल्याने रशियाला चिंता

रशिआत जननाचे प्रमाण घटल्यामुळे आणि सेवानिवृत्त झालेल्या वृद्धांची संख्या वाढत चालल्यामुळे सरकारला चिंता वाटू लागली आहे. पश्चिमेकडील देशांशी आर्थिक क्षेत्रात चढाओढ करण्याची ताकद त्यामुळे कमी होईल. कारण, काम करण्यास समर्थ असलेल्या लोकांची संख्या ह्या घटनेमुळे घसरत जाईल असे त्या सरकारला वाटत आहे. सध्या रशिआची लोकसंख्या २३·८ कोटी आहे. परंतु जननामधील घट अशीच राहिल्यास १९७० च्या सुमारास ऐन लोकसंख्येतच घट होईल असा इषारा एका आकडेशास्त्रीय तज्ज्ञाने दिला आहे. ह्यावर उपाय म्हणून मोठ्या कुटुंबांना अधिक भत्ते देण्याच्या सूचना करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे वयस्कर लोकांना पुन्हा कामावर घेण्याच्या योजना आखण्यात येत आहेत. दरम्यान, सेवानिवृत्तीचे वय कमी असल्यामुळे आणि आयुष्याची अपेक्षा वाढत चालल्यामुळे वृद्धवेतनाला पात्र असणारांची संख्या वाढत चालली आहे. कामावर जाणाऱ्या मातांची वाढती संख्या आणि दाटीवाटीची राहणी ह्या कारणांमुळे जननाचे प्रमाण घटत असल्याचे सांगण्यात येत आहे. मोठ्या शहरातील रशिअन कुटुंबात सध्या एक अगर दोनच मुले असल्याचे आढळून येते. तरीसुद्धा कामावर जाणाऱ्या मातांना त्यांच्याकडे नीट लक्ष देणे अवघड जाते. राहण्याच्या जागेची टंचाई असल्यामुळे अधिक मुले होऊ न देण्याची प्रवृत्ती बळावत चालली आहे. गर्भपाताला मुभा असल्याने कुटुंबातील माणसांची संख्या बेताची राखणे सोपे जाते. मोठ्या शहरांतून जननांपेक्षा गर्भपात अधिक होतात. त्यामुळे काम करणाऱ्या लोकांची संख्या कमी होत चालली आहे. पुरुषांचे सेवानिवृत्तीचे वय ६० आणि स्त्रियांचे ५५ आहे. परंतु ही वये ज्या वेळी जगण्याची अपेक्षा सध्यापेक्षा कमी होती आणि म्हातारपण लवकर येत असे, त्या वेळी ठरविण्यात आलेली आहेत.

**बेकार इंजिनिअरांना काम**—मद्रास राज्यात छोटे कारखाने काढण्यात पुढाकार घेणाऱ्यांना ७५ टक्के मदत सरकारकडून मिळत आहे. सध्या इंजिनिअरांवर बेकारीचे संकट कोसळले आहे. अशा इंजिनिअरांपैकी कोणी पुढे येऊन छोटा उद्योगधंदा काढण्याची तयारी दाखविली तर इतरांपेक्षा त्यांना प्राधान्य देण्यात येईल असे मद्रासच्या उद्योगमंत्र्यांनी जाहीर केले आहे.

**कलकत्त्यामधील दुःस्थितीचे संभाव्य परिणाम**—"सबंध जगात कलकत्ता शहराइतके गलिच्छ, दाट वस्तीचे, मरणप्राय घाणेरडे, दुर्लक्षित शहर सबंध जगात दुसरे नाही." असे सर्टिफिकेट 'न्यूयॉर्क टाइम्स' ह्या वृत्तपत्राने त्या शहराला दिले असून कलकत्त्यात त्यामुळे किंवा अन्य कारणाने बंडाळी माजली, तर भारताच्या समाजवादी वाटचालीस प्रचंड धोका निर्माण होईल, असा गंभीर इशारा दिला आहे.

## हिंदी बुटांच्या निर्यातीच्या समस्या

भारतामधून होणारी निर्यात वाढविण्याच्या कामी सरकारी व्यापार महामंडळ आपल्यापरी हातभार लावीत आहे. व्यापार महामंडळ गेली १० वर्षे रशिआला बुटांची निर्यात करीत आहे. दरसाल सुमारे ३ कोटी रुपयांच्या १० लाख बूटजोड्या रशिआ विकत घेत आहे. बुटांच्या प्रकाराबद्दल व दर्जाबद्दल रशिआकडून तपशीलवार माहिती घेऊन ती आग्रा, कानपूर इत्यादी ठिकाणच्या छोट्या कारखानदारांना पुरविण्यात येते. मग ते कारखानदार त्याप्रमाणे माल तयार करतात. बुटांची निर्यात रशिआशिवाय इतर युरोपीय देशांत करण्याची हिंमतही व्यापार मंडळ बाळगत आहे. परंतु आता रशिआ भारताकडून माल विकत न घेण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे. १९६५ पर्यंत भारतामधूनच रशिआ मुख्यतः आयात करीत असे. रशिआत कुश्चॉव्ह ह्यांच्या पदच्युती नंतरही आर्थिक बाबतीत काहीसे प्रागतिक धोरण स्वीकारले जात आहे. गिऱ्हाइकांची पसंती–नापसंती लक्षात घेऊन त्यांना नवीन प्रकारचा माल प्रसंगी आयात करूनही देण्याचे धोरण स्वीकारण्यात येत आहे. रशिआतील खरेदी संघटना ब्रिटन, इटली आणि पश्चिम जर्मनी ह्या देशांकडूनही अद्ययावत् पद्धतीची पायतणे आयात करू लागल्या आहेत. अर्थातच, ह्या देशांच्या मालाशी भारताच्या मालाची दर्जाच्या व किंमतीच्या बाबतीत तुलना करण्यात येऊ लागली आहे. रशिआतील विस्तृत बाजारपेठेचा अधिकातअधिक फायदा घेण्याची तत्परता पश्चिम युरोपातील देश दाखवीत आहेत. त्यामुळे भारतामधील कारखानदारांना आता तीव्र स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे. पाकिस्तानची स्पर्धाही भारताच्या मालाला होऊ लागली आहे. कारण, पाकिस्तानात गोहत्या विरोध नसल्यामुळे तेथील माल तुलनेने अधिक चांगल्या प्रकारचा निघतो.

रशिआ आणि पूर्व युरोपातील बुटांच्या बाजारपेठांतील फॅशन्समध्ये होणाऱ्या बदलाची भारतामधील कारखानदारांना दखल घ्यावी लागेल. हंगेरीत तर बदललेल्या फॅशनची फारच चलती असते. ह्या देशांकडून आलेल्या नवनवीन नमुन्यांप्रमाणे माल तयार करावयाचा तर त्यासाठी नवीन साचे व इतर साधने ह्यावर काही प्राथमिक खर्च करावा लागतो. असा खर्च करण्यास भारतामधील बुटांचे छोटे कारखानदार अतिशय नाखूष असतात आणि तो खर्च करण्यास ते तयार झालेच तर एकदम मोठ्या मागणीची अपेक्षा करतात. पुष्कळदा नमुन्यात पुन्हा फरक करण्यात येतो आणि मग कारखानदार अधिकच नाराज होतात. गेली १० वर्षे व्यापार महामंडळ ह्या कारखानदारांना मालाच्या मागण्या सातत्याने पुरवीत आहे. ह्या व्यवहारात कारखानदारांना प्राप्तीही चांगली झाली आहे. परंतु तीमधील ठराविक हिस्सा पुन्हा धंद्यातच गुंतविण्याची प्रवृत्ती त्यांच्यात दिसत नाही. त्याऐवजी आपल्या बायकामुलांना दागिने करण्यातच ते मशगूल झालेले दिसतात. म्हणजे असे की, कारखान्याकडे एक उद्योगधंदा म्हणून पाहण्याची त्यांची वृत्ती दिसत नाही. पाश्चिमात्य देशात मात्र धंदेवाईक दृष्टीने विचार करण्याची प्रथा रुजलेली आहे. तथापि, ह्या सर्व परिस्थितीमुळे व्यापार महामंडळ घाबरून गेलेले आहे असे नाही. रशिआ आणि पूर्वयुरोपातील देशांशिवाय इतर देशांतही हिंदी बुटांना बाजारपेठ मिळविण्याची खटपट मंडळ करीत आहे. काही प्रकारच्या बुटांची ३ कोटी रुपयांची मागणी अमेरिकेकडून मंडळाने मिळविली आहे. अमेरिका आणि पश्चिम जर्मनी ह्या देशांत हिंदी बुटांना मोठ्या मागण्या मिळतील की काय ह्याचा अभ्यास करण्यासाठी व्यापार मंडळाचा एक अधिकारी लवकरच त्या देशांच्या दौऱ्यावर जाणार आहे.

## उसाची किंमत लवकर चुकती करण्याचे प्रयत्न

साखरकारखान्यांना उसाचा पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांनी घातलेल्या उसाची किंमत साखरकारखान्यांकडून लवकर मिळत नाही अशा तक्रारी ऐकू येतात. साखरेचा धंदा हंगामी असल्यामुळे कारखान्यांना पैसा नेहमीच उपलब्ध असतो असे नाही. तरीसुद्धा उसशेतकऱ्यांना त्यांच्या मालाची किंमत त्वरित देण्याची व्यवस्था करण्याचे आदेश मध्यवर्ती सरकारने राज्य सरकारांना दिले आहेत. शेतकऱ्यांची बाकी चुकती करण्यासाठी दोषी कारखान्यांविरुद्ध जरूर तर खटले भरण्याचीही सूचना करण्यात आली आहे. १९६७–६८ सालच्या साखरेच्या हंगामात देशातील साखरकारखान्यांनी १८२·९४ कोटी रुपयांचा ऊस खरेदी केला. १९६८ च्या जून अखेरीस ह्या रकमेपैकी ८·२६ कोटी रुपये शेतकऱ्यांना मिळालेले नव्हते. मद्रास राज्यातील साखरकारखान्यांनी १२·४९ कोटी रुपये किमतीचा ऊस खरेदी केला. त्यापैकी २५·४८ लाख रुपयांची रक्कम शेतकऱ्यांना द्यावयाची राहिलेली आहे. उत्तर प्रदेशातील साखरकारखान्यांनी सर्वांत अधिक म्हणजे ७०·५६ कोटी रुपयांचा ऊस खरेदी केला. त्यापैकी २·४१ कोटी रुपयांची रक्कम शेतकऱ्यांना अद्याप मिळावयाची आहे. महाराष्ट्र राज्यातील खाजगी व सहकारी साखरकारखान्यानी हंगामात ४५·४६ कोटी रुपयांचा ऊस खरेदी केला. त्यापैकी ३·४७ कोटी रुपयांची रक्कम कारखान्यांकडे थकबाकी म्हणून राहिलेली आहे. बिहारमधील साखरकारखान्यांनी संबंधित हंगामात १७·५१ कोटी रुपयांच्या उसाची खरेदी केली. त्यापैकी ४·८ कोटी रुपयांची थकबाकी कारखान्यांकडे आहे. बिहारमधील खरेदीच्या मानाने थकबाकीची रक्कम सर्वांत अधिक असल्याचे दिसून येते.

**हरियानात सरकारी लॉटरी**—हरिआनाचे १९६८–६९ सालचे अंदाजपत्रक विधान सभेत मांडण्यात आले. त्यात ८·२२ कोटी रुपयांची तूट दाखविण्यात आली आहे. हरिआना सरकारने एक सरकारी लॉटरी सुरू करण्याचे ठरविले आहे. चालू वर्षाच्या उरलेल्या सात महिन्यांत सोडतीमुळे ५० लाख रुपयांचे उत्पन्न होईल असा अंदाज आहे.

## ग्रामीण भागात वीज पुरविण्यासाठी योजना

महाराष्ट्र राज्याच्या वीज मंडळाने १९६८-६९ सालात ग्रामीण भागांना वीजपुरवठा करण्याची एक योजना तयार केली आहे. योजना अमलात आणण्यासाठी १५ कोटी रुपयांचा खर्च करण्याची तरतूद आहे. ही सर्व रक्कम योग्य रीतीने वापरण्यात यावी म्हणून विशेष दक्षता घेण्यात येणार आहे. ह्या कामी प्रत्येक जिल्ह्यातील विकासाधिकाऱ्याचे सहकार्य घेण्यात आले आहे. वीजपुरवठ्यात येणाऱ्या अडचणींचा ह्या सहकार्यामुळे लवकरात लवकर निरास करणे शक्य होईल. ग्रामीण भागातील जी ठिकाणे अधिक मागासलेली आहेत त्यांच्या खास गरजा भागविण्याच्या दृष्टीने योजनेत तरतूद करण्यात आली आहे. आदिवासी लोक ज्या भागात राहातात त्याची विशेष दखल घेण्यात आली असून त्याप्रमाणे योजनेची आखणी करण्यात आली आहे.

## १९७० साली हवामानावर नियंत्रण

डॉ. व्ही. एस्. सोहोनी ह्यांनी नागपूर येथे बोलताना अशी माहिती सांगितली की १९७० च्या सुमारास शास्त्रज्ञांना हवामानावर काही बाबतीत नियंत्रण ठेवता येईल अशी चिन्हे दिसत आहेत. हवामानाचा अभ्यास व संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांनी हवामानाच्या परीक्षणासाठी अंतराळात पाठविलेल्या कृत्रिम ग्रहांकडून उपयुक्त माहिती मिळत असते. तिचा उपयोग करून कृत्रिम पाऊस पाडणे आणि वादळांचा उपशम करणे ह्या गोष्टी साध्या करता येतील. अमेरिकेत हवामानशास्त्रविषयक संशोधन फार मोठ्या प्रमाणावर चालू आहे. त्यात अनेक कंपन्यांचे सहकार्य घेण्यात आलेले आहे. निरनिराळ्या कंपन्यांना कृत्रिम ग्रहाचे निरनिराळे भाग करण्याचे काम देण्यात येते. एका कंपनीचे संशोधनविषयक अंदाजपत्रक भारताच्या अंदाजपत्रकापेक्षाही मोठे आहे.

## अमेरिकन दूरचित्रवाणी कंपन्यांना विनंती

धूम्रपानाने कॅन्सर हा रोग होण्याचा संभव बळावतो असा अभिप्राय अमेरिकन शास्त्रज्ञांनी व्यक्त केलेला आहे. त्याचा परिणाम होऊन अमेरिकन नागरिकांपैकी कित्येक नागरिक धूम्रपान सोडण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु अमेरिकेतील टेलिव्हिजन कंपन्यांचा ह्या बाबतीत अडथळा येत आहे. दूरचित्रवाणीवर दाखविण्यात येणाऱ्या चित्रपटांपैकी ७१ टक्के चित्रपटात नट अगर नटी धूम्रपान करताना दाखविण्यात येतात. त्यामुळे बालमनावर आणि धूम्रपान सोडण्याच्या खटपटीत असणाऱ्या लोकांच्या मनावर वाईट परिणाम होतो अशी तक्रार अमेरिकन कॅन्सर सोसायटीने केली आहे. धूम्रपानाची सवय ही धोक्याची आणि पसरत जाणारी असल्यामुळे दूरचित्रवाणीवरील दृश्यात तिला इतके स्थान देण्यात येऊ नये असे सोसायटीने सुचविले आहे.

## पोपचा संततिनियमनाला तीव्र विरोध

पॉल पोपने एक फर्मान काढून संततिप्रतिबंधाला कॅथॉलिक धर्माचा तीव्र विरोध जाहीर केला आहे; नैसर्गिक संतती कोणत्याही प्रकारे होऊ न देण्याचा प्रयत्न अनैतिक आणि म्हणून अग्राह्य आहे, असे त्याने म्हटले आहे. पोप तेरावा जॉन ह्याने पाच वर्षांपूर्वी ह्या प्रश्नाचा सर्वांगीण विचार करण्यासाठी एक कमिशन नेमले होते. दोन वर्षांपूर्वी ह्या कमिशनने आपला अहवाल पोपला सादर केला. कृत्रिम संतती प्रतिबंधाला असलेली बंदी सैल करावी, असे त्या कमिशनच्या ८०% सदस्यांचे मत होते. पण पॉल पोपने ते मत धुडकावून लावले आहे. तरुण आणि उदारमतवादी कॅथॉलिक लोकांत त्यामुळे असंतोष होण्याचा संभव आहे. संतती प्रतिबंधाची एकच पद्धत पोपला अमान्य नाही; ती म्हणजे 'रिदम' पद्धत. परंतु तिचीही सातत्यता पोपला मान्य नाही.

## दहा रुपयेवाल्या नव्या नोटांवर हिंदीत मजकूर

रिझर्व्ह बँक १० रुपयेवाल्या नव्या नोटा लवकरच प्रसारात आणणार आहे. सध्याच्या नोटा चालू रहातीलच. नव्या नोटांचा कागद आणि लांबी-रुंदी ह्यात फरक होणार नाही. पृष्ठ भागावर "भारतीय रिज़र्व बैंक", "केन्द्रीय सरकार द्वारा प्रत्याभूत" आणि "मैं धारक को दस रुपये अदा करने का वचन देता हूँ" अशी इंग्रजी मजकुराखाली हिंदी भाषांतरे छापली जातील. मागील बाजूसही "भारतीय रिज़र्व बैंक" असे छापण्यात येईल.

---

**गिर्यारोहणाचे शिक्षण**—गुजरात राज्याच्या रस्ते आणि वाहतूक मंत्र्यांनी अशी माहिती सांगितली आहे की गुजरातमधील गिर्यारोहकांच्या एका तुकडीला गिर्यारोहणाचे शिक्षण देण्यासाठी स्विटझरलँडला पाठविण्यात येणार आहे. ह्या तुकडीत ५ जणांचा समावेश असेल. त्यात काही तरुणीही असतील. स्विटझरलंडमधील आल्पस् पर्वतावर चढण्याचे शिक्षण त्यांना देण्याचे काम स्थानिक तज्ज्ञ गिर्यारोहक करणार आहेत.

**पॅसेंजर सर्व्हिस फी आकारणार**—मुंबईतील सांताक्रुझ, कलकत्त्यामधील डमडम, दिल्लीमधील पालम आणि मद्रासमधील मीनकुंभकम ह्या विमानतळावरून जे प्रवासी भारताबाहेरच्या प्रवासाला जातील त्यांच्याकडून प्रत्येकी १५ रुपये पॅसेंजर सर्व्हिस फी घेण्याचे ठरविण्यात आले आहे. चालू वर्षाखेर ती आकारण्यास प्रारंभ होईल. ह्या आकारणीमुळे दरसाल ४८ लाख रुपयांचे उत्पन्न होईल असा अंदाज आहे.

**हिंदी चित्रपटांच्या प्रगतीचे प्रदर्शन**—भारताच्या चित्रपट व्यवसायाची १९३० पासून आतापर्यंतची प्रगती दर्शविणारे एक प्रदर्शन पॅरिसमध्ये ९ ऑक्टोबरपासून ८ नोव्हेंबरपर्यंत उघडण्यात येणार आहे.

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण है: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



डबल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना ३७६१०२


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.